24 FEB 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ७४७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ७४७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी एमफार्मसी, एमबीए, एमएस्सी, एमकॉम, बीफार्मसी या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला २ हजार १५६ विद्यार्थी उपस्थित होते. मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

24 FEB 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ७४७ अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी ५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १६ केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी २ हजार १५६ विद्यार्थी उपस्थित होते, तर दिवसभरात २ आणि आजअखेर ७४७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.

जनसंपर्क कक्ष
24 FEB 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# त्यागानेच अष्टपैलू व्यक्तिमत्व उदयास




कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना शिवचरित्र अभ्यासक सुलभा सत्तुरवार सोबत प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एन. टी. पाटील आदी

- **शिवचरित्र अभ्यासक सुलभा सत्तुरवार**
- **शिवाजी विद्यापीठात अष्टावधानी शिवकार्य व्याख्यान**

प्रतिनिधी
कोल्हापूर

अष्टपैलू व्यक्तिमत्व एका दिवसात तयार होत नाही. त्यासाठी प्रचंड कष्ट आणि त्याग करावा लागतो. ज्यावेळी माणूस स्वतःच्या पलीकडे जाऊन विचार करतो त्यावेळेस तो इतिहास घडवतो. शिवाजी महाराजांना घडविण्यामध्ये वडील शहाजीराजे व जिजाऊंचा वाटा अत्यंत मोलाचा होता, असे प्रतिपादन पुणे येथील शिवचरित्र अभ्यासक सुलभा सतुरवार यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातीच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अष्टावधानी शिवराय" या विषयावर व्याख्यानात त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ.ज्योती जाधव होत्या.

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर येथील उपप्राचार्य, डॉ.एन. टी.पाटील यांच्या 'स्वराज्यगाथा" या काव्य संग्रह पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, राष्ट्रभावना लोकांमध्ये रूजविण्यासाठी काय योग्य आहे याचे आकलन असणारे छत्रपती शिवाजी महाराज महान राजे होते. उपप्राचार्य डॉ.एन.टी.पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे मानवी इतिहासातील अजरामर नांव आहे. अत्यंत कुशलतेने डावपेच अखणारे, प्रचंड बुध्दीमत्ता धारण करणारे, जनतेचे कैवारी असे राजे होते.

युवाशाहीर डॉ. अमोल रणदिवे व सहकार्यांनी शाहिरी पोवाडाचे सादरीकरण केले. संशोधक विद्यार्थी सद्दाम मुजावर यांनी प्रास्ताविक केले. संशोधक विद्यार्थी शुभम गिरीगोसावी यांनी ओळख करून दिली. मोहिनी सुर्वे, अनिता पवार यांनी सुत्रसंचालन केले. सौरभ पवार यांनी आभार मानले.

यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.तुकाराम चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ.शरद बनसोडे, डॉ.प्रल्हाद माने, बालशिवाजींचे वेशभूषा केलेले स्वराज्य गावडे, गोखले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंगराव भूयेकर आदी उपस्थित होते.

24 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

## अर्थमिती संस्थेच्या हीरक महोत्सवानिमित्त आयोजन : प्रा. डॉ. एम. एस. देशमुख : तीन दिवस चालणार परिषद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेचे आयोजन २६ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान केले आहे, अशी माहिती मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख, परिषदेचे सचिव प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

हीरक महोत्सवी परिषदेच्या उद्घाटन सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. महेंद्र देव चेअरमन आर्थिक सल्लागार समिती पंतप्रधान कार्यालय भारत सरकार हे उपस्थित राहून भारतातील अर्थशास्त्र, अर्थमिती व इतर



सामाजिक शास्त्रांशी निगडीत संशोधक, शिक्षक, विद्यार्थी यांना मार्गदर्शन करतील. भारतीय अर्थमिती संस्थेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. नीरज हातेकर हे संस्थेचे अध्यक्ष या नात्याने अध्यक्षीय मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेचे यजमानपद हे शिवाजी विद्यापीठाकडे असल्याने विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी हे उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतील तसेच या प्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव, डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता व कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेचे उद्घाटन शाहू सिनेट हॉल मुख्य प्रशासकीय इमारत येथे सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेत होणार आहे. यावेळी विविध अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत, तज्ज्ञ, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी यांच्या वतीने सादर करण्यात येणाऱ्या संशोधन लेखांच्या संक्षिप्त सारांशाचे पुस्तक तज्ज्ञ मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या परिषदेसाठी विविध तज्ज्ञ मान्यवरांची विशेष व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. त्यामध्ये भारतीय अर्थमिती संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. चंद्रशेखर, आय. आय. टी. बॉम्बेचे डॉ. विनिशक थुरिया, आयएसआय दिल्लीचे डॉ.प्रबळ रॉय चौधरी व डॉ. फरझाना आफ्रेदी, डॉ. ए. गणेश कुमार, डॉ. बिस्वजित चटर्जी, डॉ. तिर्थंकार पटनाईक, डॉ. बी. कामाईहा यांचा समावेश आहे. तसेच यादरम्यान गटचर्चा होणार आहे. यामध्ये डॉ. उमाकांता दास, डॉ. पूजा गुहा, डॉ. आर. नागराज व डॉ. नीरज हातेकर,

प्रा. ज्ञानदेव तळूले, प्रा. प्रकाश कांबळे, प्रा. सुरेश मैंद व डॉ. विनायक देशपांडे यांचा समावेश आहे. तरी या परिषदेसाठी विविध विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व अभ्यासक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख व परिषदेचे सचिव प्रा. डॉ. एम. एस. देशमुख व भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव प्रा. के. शानमुगन यांनी केलेले आहे.

2 4 FEB 2026

पुढारी

# विद्यापीठात 'म. सु. पाटील यांचा समीक्षा विचार' विषयावर आज चर्चासत्र, पुरस्कार वितरण समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग व नव-अनुष्टुभ परिवार, प्रतिष्ठान, येवला (नाशिक) यांच्या वतीने दि. २४ फेब्रुवारी रोजी 'डॉ. म. सु. पाटील यांचा समीक्षा विचार' या विषयावर चर्चासत्र व पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह येथे सकाळी ११ ते ५ या वेळेत चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्राचे बीजभाषण प्राचार्य डॉ. दिलीप धोंगडे करणार आहेत. यात गणेश कनाटे, आशुतोष पाटील, नंदकुमार मोरे, वीरधवल परब हे म. सु. पाटील यांचा समीक्षा विचार केंद्रस्थानी ठेवून मांडणी करणार आहेत. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. एकनाथ पगार, डॉ. प्रतिभा कणेकर असणार आहेत. दुपारी ४ वाजता ज्येष्ठ समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. पाटील यांच्या कन्या-मराठीतील प्रसिद्ध लेखिका नीरजा प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

24 FEB 2026

पुढारी

# शिक्षणशास्त्र विभागात निसर्ग मंडळाचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभाग येथे माजी विद्यार्थी, पालक मेळावा झाला. याप्रसंगी अधिविभागात निसर्ग मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. रूपाली संकपाळ यांनी केले. ऐश्वर्या मरूथूवर, राजनंदिनी यांनी सूत्रसंचालन केले. राहुल माने यांनी आभार मानले. यावेळी माजी प्राचार्य एम. व्ही. शेख, प्रदीप पाटील, प्रमोद तांदळे, नगीना माळी, अफसाना मणेरी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात माजी विद्यार्थी व पालक मेळावा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थी, पालक मेळावा व विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साहत पार पडला. याप्रसंगी अधिविभागातील वेगवेगळ्या शैक्षणिक वर्षांचे माजी विद्यार्थी ऑनलाईन व प्रत्यक्ष उपस्थित होते. अधिविभागात 'निसर्ग मंडळ'चे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. माधुरी वाळवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. रूपाली संकपाळ यांनी केले. पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी साधला. सूत्रसंचालन ऐश्वर्या मरुथुवर, राजनंदिनी यांनी केले, तर आभार राहुल माने यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
24 FEB 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थी, पालक मेळावा उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे माजी विद्यार्थी, पालक मेळावा व विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साहत झाला. अधिविभागातील माजी विद्यार्थी ऑनलाइन व प्रत्यक्ष उपस्थित होते. त्याचबरोबर विभागातील एम.एड,बी.एड, एम. एड (एकात्मिक) बी. एससी. बी. एड (ITEP) या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पालक ऑनलाइन व प्रत्यक्ष उपस्थित उपस्थित होते.

अधिविभागात "निसर्ग मंडळाचे" उद्घाटन केले. याप्रसंगी प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार अभिनव पद्धतीने केला, निसर्ग व जैवविविधता संवर्धनाच्या दृष्टिकोनातून 'बीजसंग्रह' यामध्ये विविध वनस्पतींच्या बीजांची पेटी केली. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक बीजांची साठवणूक करतात व त्यामधून 'सीड बॉल्स' बनवायचे व गरजूपर्यंत ते पोहोचवायचे त्याचप्रमाणे बीजमाता पद्मश्री विजेत्या राहिबाई पोपेरे यांच्याकडून देखील १४ प्रकारच्या प्रजातींच्या बिया अधिविभागाकडून मागविल्या व त्या अधिविभागामध्ये येणाऱ्या प्रमुख अतिथींना, माजी विद्यार्थ्यांना, पालकांना देऊन व टाकाऊ कागदापासून तयार केलेली फुले सत्कारप्रसंगी देवून संकल्पना रुजविण्याचा प्रारंभ केला. अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाच्या माध्यमातून कला सादर केली. याप्रसंगी अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर प्रस्तुत कार्यक्रमाच्या संयोजन डॉ. रुपाली संकपाळ यांनी केले. पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद डॉ. विद्यानाद खंडागळे यांनी साधला. सूत्रसंचालन प्रशिक्षणार्थी ऐश्वर्या मरुथूवर व राजनंदिनी यांनी केले तर आभार प्रशिक्षणार्थी राहुल माने यांनी आभार मानले. प्रस्तूत कार्यक्रमासाठी माजी प्राचार्य एम. व्ही. शेख, प्रदीप पाटील, प्रमोद तांदळे, नगीना माळी, अफसाना मणेरी, उमेश बेनके, अनिजा सूर्यवंशी, रुपाली भारमल, धीरज घाडगे व अधिविभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पालक होते.

24 FEB 2026

जनप्रवास

# राजर्षी शाहू महाराज चरित्र ग्रंथाचा सन्मान

कोल्हापूर : येथील करवीर साहित्य परिषद आणि संत गाडगेमहाराज अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्य स्पर्धा -२०२५ मध्ये अर्थायनकार प्राचार्य डॉ. जे. के. पवार लिखित' राजर्षी शाहू महाराज संक्षिप्त चरित्र' या ग्रंथास प्रथम क्रमांक देऊन सन्मानित केले. रोख एक हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र असे स्वरुप आहे. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागाचे विश्वस्त एम. बी. शेख, व्हाईट आर्मीचे अशोकराव रोकडे, अध्यासनाचे अध्यक्ष एस. एन. पाटील, परिषदेच्या अध्यक्षा डॉ. एस. बी. बिडकर या मान्यवरांच्या हस्ते ही पारितोषिके दिली. कार्यक्रमास प्रा. किसनराव कुराडे, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, एम. डी. देसाई, जॉर्ज क्रुज, वाचनकट्ट्याचे संस्थापक कदम, डॉ. रुपा शहा होते.

2 4 FEB 2026
पुढारी

# विद्यापीठात गुरुवारपासून भारतीय अर्थमिती संस्थेची राष्ट्रीय परिषद

- अर्थशास्त्र अधिविभागाचा पुढाकार; तीन दिवस विविध कार्यक्रम




डॉ. एस. महेंद्र देव डॉ. नीरज हातेकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषदेचे २६ ते २८ फेब्रुवारीदरम्यान आयोजन केल्याची माहिती मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

हीरक महोत्सवी परिषदेचे उद्घाटन शाहू सिनेट हॉल येथे सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान कार्यालय आर्थिक सल्लागार समितीचे चेअरमन डॉ. एस. महेंद्र देव उपस्थित राहणार आहेत. डॉ. नीरज हातेकर अध्यक्षीय भाषण करतील. प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करणार आहेत.

याप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता व कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या परिषदेसाठी तज्ज्ञ मान्यवरांची विशेष व्याख्याने होणार आहेत. त्यामध्ये भारतीय अर्थमिती संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. चंद्रशेखर, आय.आय.टी. बॉम्बेचे डॉ. विनिश कथुरिया, आय.एस.आय. दिल्लीचे डॉ. प्रबळ रॉय चौधरी व डॉ. फरझाना आफ्रेदी, डॉ. ए. गणेश कुमार, डॉ. बिस्वजित चटर्जी, डॉ. तिर्थंकार पटनाईक, डॉ. बी. कामाईहा यांचा समावेश आहे. तसेच, यादरम्यान गटचर्चा होणार आहे. यामध्ये डॉ. उमाकांता दास, डॉ. पूजा गुहा, डॉ. आर. नागराज व डॉ. नीरज हातेकर, प्रा. ज्ञानदेव तळुले, प्रा. प्रकाश कांबळे, प्रा. सुरेश मैंद व डॉ. विनायक देशपांडे यांचा समावेश आहे.

24 FEB 2026

सकाळ

# भारतीय अर्थमिती संस्थेची गुरुवारपासून राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था आणि डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीतर्फे हिरक महोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषद गुरुवार (ता. २६) ते शनिवार (ता.२८) दरम्यान होणार आहे.

या परिषदेच्या उद्‌घाटन सत्रासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव आणि भारतीय अर्थमिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. नीरज हातेकर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असतील. तीन दिवस चालणाऱ्या परिषदेसाठी विविध तज्ज्ञ मान्यवरांची विशेष व्याख्याने होणार आहेत. त्यात भारतीय अर्थमिती संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. चंद्रशेखर, आयआयटी मुंबईचे डॉ. विनिश कथुरिया, आयएसआय दिल्लीचे डॉ. प्रबळ रॉय चौधरी, डॉ. फरझाना आफ्रेदी, ए. गणेश कुमार, बिस्वजित चटर्जी, तीर्थंकार पटनाईक, बी.कामाईहा यांचा समावेश आहे. गटचर्चेत डॉ. उमाकांता दास, पूजा गुहा, आर. नागराज, ज्ञानदेव तळुले, प्रकाश कांबळे, सुरेश मैंद, विनायक देशपांडे सहभागी होणार आहेत.

24 FEB 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या अकाउंटन्सी म्युझियम ऑफ इंडियाच्या संग्रहालयाची प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी पाहणी केली.

# अकाउंटन्सी म्युझियम वाणिज्य शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा

## उद्घाटनप्रसंगी प्र. कुलगुरु डॉ. गोसावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू करण्यात आलेला 'अकाउंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया' हा उपक्रम वाणिज्य शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. हे संग्रहालय वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांसाठीही उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्या सहकार्यातून अकाउंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया प्रस्थापित करण्यात आले. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सी. ए. नितीन हरगुडे डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तेजपाल मोहरेकर, आशिष सेवेकरी आदी उपस्थित होते.

## संग्रहालयात देश-विदेशातील इतिहास

या संग्रहालयामध्ये भारतातील व विदेशातील लेखाशास्त्राचा इतिहास, जुन्या लेखा नोंदी, पारंपरिक पद्धती, जुनी चलन पद्धती तसेच चार्टर्ड अकाउंटंट व्यवसायाशी संबंधित व्यापक माहिती सादर केलेली आहे. त्यामुळे वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षण अधिक परिणामकारक आणि अनुभवाधारित होण्यास मदत होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ
24 FEB 2026
तरुण भारत

# संत गाडगेबाबा जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांनी गाडगेबाबा महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजनप्रशासकीय सेवक, शिक्षक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 FEB 2026 तरुण भारत




कोल्हापूर : दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाचे डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, उपकुलसचिव संध्या आडसुळे, सुरेखा अडकी आदी उपस्थित होते.

2 4 FEB 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराज जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** संत गाडगेबाबा महाराजांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, एमबीए अधिविभागप्रमुख डॉ. दीपा इंगवले, डॉ. जयश्री लोखंडे, डॉ. तेजश्री घोडके, सुरेखा आडके, स्मिता कांबळे, अनिता पाटील आदी उपस्थित होते.

24 FEB 2026

लोकमत




शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत सोमवारी डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# विद्यापीठात गाडगे महाराज जयंती

**कोल्हापूर :** संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती सोमवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, एमबीए विभागप्रमुख डॉ. दीपा इंगवले, डॉ. जयश्री लोखंडे, डॉ. तेजश्री घोडके, सुरेखा आडके, स्मिता कांबळे, अनिता पाटील आदी उपस्थित होते.